आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२७ जुलै २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- विकसित भारत हे प्रत्येक देशवासियांचं ध्येय असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं नीती आयोगाच्या बैठकीत प्रतिपादन

- नदीजोड प्रकल्प वेगाने हाती घेण्याच्या सूचना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिल्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची माहिती

- अर्थसंकल्पात जाहीर झालेल्या १२ पैकी देशातला सर्वात मोठा औद्योगिक पार्क दिघीमध्ये होणार असल्याची केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांची मुंबईत घोषणा

- नवी मुंबईत बेलापूरमध्ये इमारत कोसळून तिघांचा मृत्यू

**आणि**

- भारताविरुद्धच्या टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा श्रीलंकेचा निर्णय

**<><><><><>**

विकसित भारत २०४७ हे प्रत्येक भारतीयाचं ध्येय असून ते साध्य करण्यासाठी राज्य सरकारं महत्वाची भूमिका पार पाडू शकतात, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. नवी दिल्लीत नीती आयोगाच्या ९ व्या बैठकीत ते आज बोलत होते. हे दशक तांत्रिक, भौगोलिक, राजकीय बदलाचं तसचं नवी संधी उपलब्ध करणारं असल्याचंही त्यांनी सांगितलं. भारतानं या संधीचा वापर करुन आंतरराष्ट्रीय स्तरावरील गुंतवणूक वाढवायला हवी असंही ते म्हणाले. या

वर्षीच्या बैठकीचं घोषवाक्य ‘विकसित भारत २०४७’ असून त्याच्या ध्येय धोरणांच्या मसुद्यासाठी या बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे.

या बैठकीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह सर्व राज्यांचे मुख्यमंत्री त्याचप्रमाणे केंद्रशासित प्रदेशांचे नायब राज्यपाल, विशेष निमंत्रित आणि नीती आयोगाचे उपाध्यक्ष तसेच सदस्य उपस्थित आहेत.

<><><><><>

नदीजोड प्रकल्प वेगानं हाती घेण्याच्या सूचना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिल्या आहे, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज नवी दिल्लीत दिली. नीती आयोगाच्या बैठकीत त्यांनी हा मुद्दा मांडला होता. या बैठकीत अतिशय सकारात्मक चर्चा झाल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

<><><><><>

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला वित्त विभागाचा विरोध असल्याच्या बातम्या खोट्या असून राजकीय हेतून प्रेरित असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. वर्ष २०२४-२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पात ही योजना सादर करण्यात आली आहे. वित्त आणि नियोजन विभाग तसंच मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतरच या योजनेची घोषणा करण्यात आल्याचं पवार यांनी स्पष्ट केलं. या योजनेत अधिकाधिक महिलांना सहभागी करून घेण्याचं आवाहनही त्यांनी केलं.

<><><><><>

केंद्रीय अर्थसंकल्पात घोषणा केलेल्या १२ पैकी सर्वात मोठा औद्योगिक पार्क राज्यात रायगड जिल्ह्यातल्या दिघीमध्ये होणार आहे. यासाठी गुंतवणूकदारांकडून

सर्वाधिक विचारणा होत असल्याची माहिती केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी आज मुंबईत दिली. केंद्रीय अर्थसंकल्पाबाबत ते मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. यंदाचा अर्थसंकल्प देशाची अर्थव्यवस्था बळकट करणारा असून पुढच्या साडेतीन वर्षांमध्ये भारत जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राज्यात सर्वात जास्त सहकारी संस्था असल्याने प्रस्तावित राष्ट्रीय सहकारी धोरणाचा सर्वाधिक फायदा महाराष्ट्राला होईल, असंही त्यांनी सांगितलं. अर्थसंकल्प सादर करताना प्रत्येक राज्याचं नाव घेणं शक्य नसतं, अनेक योजना निरंतर पद्धतीने सुरू असतात, असं ते म्हणाले.

यावेळी त्यांनी वाढवण बंदर, मुंबई मेट्रो, शहरी दळणवळण प्रकल्प, विदर्भ-मराठवाड्यासाठीच्या सिंचन योजना यासह अर्थसंकल्पातल्या विविध तरतुदींचा उल्लेख केला.

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीसंदर्भात महाविकास आघाडीची चर्चा झाली असून संसदेच्या अधिवेशनानंतर जागा वाटपासंबंधीची चर्चा पुढे जाईल, असं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सांगितलं आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये त्यांनी आज वार्ताहरांशी संवाद साधला. राष्ट्रवादी काँग्रेसमधल्या फुटीनंतर अजित पवार यांच्यासोबत गेलेले विधानपरिषदेचे आमदार बाबाजानी दुर्रानी यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. जे विचारानं आमच्यासमवेत आहेत, त्यांना पक्षात परत घेण्यासंबंधी पक्षाचे नेते निर्णय घेतील, असं पवार म्हणाले.

मराठवाड्यात आरक्षणावरून जे घडत आहे, त्या संदर्भात नव्या पिढीशी सुसंवाद साधण्याची आवश्यकता पवार यांनी व्यक्त केली. आरक्षणाबाबत सरकारने

सगळ्यांना एकत्र घेऊन विश्वास निर्माण केला पाहिजे, असंही पवार म्हणाले. शरद पवार यांच्यावरील पुस्तकाचं प्रकाशनही छत्रपती संभाजीनगरमध्ये झालं. यावेळी पवार यांनी मराठवाडा नामविस्तार आंदोलनाच्या आठवणी जागवल्या.

**<><><><><>**

लोकसभेत ज्या प्रकारे केंद्रात नरेंद्र मोदी पुन्हा प्रधानमंत्री झाले त्याच प्रकारे आगामी विधानसभेत राज्यात महायुतीचं सरकार येणार असल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार प्रफुल्ल पटेल यांनी व्यक्त केला आहे. ते आज गोंदिया जिल्ह्याच्या सडक अर्जुनी तालुक्यात आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात बोलत होते. गोंदिया जिल्ह्यात लोकसभेत जी चूक झाली ती विधानसभेत होऊ देऊ नका असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

नवी मुंबईच्या बेलापूरमधल्या सेक्टर १९ मधल्या शाहबाज गावातली एक तीन मजली इमारत आज पहाटे कोसळून तिघांचा मृत्यू झाला आहे. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या दोघांना अग्निशमन दलाच्या जवानांनी बाहेर काढलं असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मदत आणि बचावकार्य पूर्ण झालं असून ५२ जणांची सुखरूप सुटका करण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या घटनेबद्दल नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलाश शिंदे यांच्याशी चर्चा केली आणि दुर्घटनाग्रस्त लोकांना तातडीनं आवश्यक मदत देण्याची सूचना केल्या होत्या. या घटनेतल्या दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आदेश नवी मुंबई महापालिका आयुक्त आणि पोलिस आयुक्तांना देण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

**कोल्हापूर**मध्ये उद्भवलेल्या पूरसदृश परिस्थितीचाही शिंदे यांनी आज आढावा घेतला. मदत आणि बचाव कार्यासाठी एनडीआरएफ आणि एसडीआरएफची पथकं तैनात करावीत, गरज भासल्यास भारतीय लष्करालाही पाचारण करावं, असे निर्देश त्यांनी दिले. आलमट्टी धरणातून पाण्याचा विसर्ग करण्याबाबत कर्नाटक सरकारशी समन्वय साधून काम करावं, असंही शिंदे यांनी सांगितलं.

**सांगली- कोल्हापूर** जिल्ह्यातला महापूराचा धोका टाळण्यासाठी कर्नाटकातील अलमट्टी धरण आणि हिप्परगी बंधारा इथली पाणी पातळी नियंत्रित करण्याबाबत केंद्रीय जल आयोगाच्या निकषांप्रमाणे कार्यवाही करावी असं आवाहन कृष्णा महा महापूर नियंत्रण नागरिक कृती समितीच्या वतीनं करण्यात आलं आहे. या संदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संपर्क साधला असल्याचं समितीचे कार्यकारी सदस्य आणि सेवानिवृत्त उप अभियंता विजयकुमार दिवाण यांनी सांगितलं

**पुण्यात** पुराचं पाणी शिरणाऱ्या भागात सीसीटीव्ही आणि पाऊस मोजणी यंत्रं बसवली जातील, असं पुणे महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांनी सांगितलं आहे.

**जळगाव** जिल्ह्यात पावसानं गेल्या २४ तासांपासून विश्रांती घेतली आहे. त्याआधी दोन दिवस तापी नदीच्या पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस झाल्यानं तापीवरच्या हतनूर धरणाचे आठ दरवाजे उघडण्यात आले आहेत.

**नवापूर** तालुक्यात काल एकाच दिवशी झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची खासदार गोवाल पाडवी यांनी पाहणी केली आहे.

**गोंदियात** पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. याचा सर्वाधिक फटका धान्य उत्पादक शेतकऱ्यांना बसला असून तात्काळ पंचनामे सुरु करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी, अशा सूचना खासदार प्रफुल पटेल यांनी जिल्हा प्रशासनाला दिल्या आहेत.

**<><><><><>**

आठ लाखांचं बक्षीस असलेल्या एका महिला नक्षलवाद्यानं आज गडचिरोलीमध्ये आत्मसमर्पण केलं. तिच्यावर चकमक आणि हत्या असे दोन गुन्हे दाखल आहेत. रिना नरोटे असं तिचं नाव असून ती भामरागड तालुक्यातल्या बोटनफुंडी इथली रहिवासी आहे. २००६ मध्ये ती नक्षलवाद्यांच्या पेरमिली दलमची सदस्य झाली होती. आत्मसमर्पण योजना सुरू झाल्यापासून आतापर्यंत ६७१ नक्षल्यांनी पोलिसांपुढे आत्मसमर्पण केल्याचं पोलीस अधिक्षक निलोत्पल यांनी सांगितलं.

**<><><><><>**

यंदा आषाढी यात्रेनिमित्त पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराच्या खजिन्यात ८ कोटी ३४ लाख रुपये जमा झाल्याची माहिती कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिली आहे. राज्यात झालेला समाधानकारक पाऊस, त्यामुळे उरकलेली शेतीची कामं यामुळे यंदा मोठ्या संख्येनं आषाढीसाठी आले होते. त्यामुळे देवाच्या तिजोरीत गेल्या वर्षीपेक्षा दोन कोटी रुपये जास्त जमा झाले आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता मन की बात या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा ११२वा, भाग आहे. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व केंद्रांवरून, तसंच newsonair.gov.in हे संकेतस्थळ आणि न्यूज ऑन एआयआर या मोबाइल ॲपवरून थेट प्रक्षेपित केला जाईल. आकाशवाणी, दूरदर्शन, प्रधानमंत्री कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब चॅनल्सवरूनही कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण आपण ऐकू शकाल.

**<><><><><>**

भारत आणि श्रीलंके दरम्यान तीन सामन्यांच्या टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला पहिला सामना आज श्रीलंकेतल्या पल्लेकल आंतरराष्ट्रीय स्टेडियम इथं सुरू आहे. श्रीलंकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ ही मालिका खेळत आहे.

सामन्याचं शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या १ षटकांत बिनबाद १३ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेत नेमबाज मनू भाकरने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात अंतिम फेरी गाठली आहे. मनु भाकरने पात्रता फेरीत ५८० गुण मिळवत तिसरं स्थान पटकावलं. **त**र रिदम सांगवानला १५ व्या स्थानावर समाधान मानावं लागलं. नेमबाजीच्या १० मीटर एअर रायफल मिश्र प्रकारात भारताचं आव्हान पात्रता फेरीत संपुष्टात आलं आहे.

**//<><><><><>//**